# १० ससोबा

**शिक्षकांसाठी :** पुढील गाणे विद्यार्थ्यांना तालासुरात व साभिनय म्हणून दाखवावे. तसेच विद्यार्थ्यांना गटात व वैयक्तिकरीत्या म्हणण्यासाठी प्रोत्साहित करावे. कवितेच्या आधारे सशाबद्दल मराठीतून बोलण्यासाठी प्रोत्साहित करावे.

## तोंडी काम

❑ **ऐका. म्हणा :**

ससा रे ससा.
असा रे कसा?
ताठ असती तुझे कान.
तोंडावरती मिश्या छान.
डोळे तुझे लाल लाल.
गुबगुबीत तुझे गाल.
अंग तुझे पांढरे पांढरे,
दिसे किती छान गोजिरे.
शेपटी तुझी इवलीशी,
हालवतोस अशी कशी?
गवत खातो कुरुकुरु.
चालतोस तू तुरुतुरु.
चाहूल लागता थोडीशी,
मारतोस तू दडी कशी?
असा रे कसा,
भित्रा तू ससा?

*— बालाजी बिरादार*





❑ **ऐका. म्हणा :**

(अ) सशाचे कान – ताठ
(आ) सशाचे डोळे – लाल लाल
(इ) सशाचे गाल – गुबगुबीत
(ई) सशाचे अंग – पांढरे पांढरे
(उ) सशाची शेपटी – इवलीशी
(ऊ) सशाच्या मिश्या – छान

❑ **एकच शब्द दोन वेळा वापरून तयार झालेले शब्द या कवितेत आले आहेत.** उदा., लाल लाल. अशा प्रकारचे तुम्हांला माहीत असलेले शब्द सांगा.

❑ **शब्दार्थ :**

| | | |
|---|---|---|
| **ससा**–rabbit.<br>**ताठ**–straight.<br>**मिश्या**–whiskers.<br>**डोळे**–eyes.<br>**गुबगुबीत गाल**–chubby cheeks. | **अंग**–body.<br>**गोजिरे**–pretty, delicate.<br>**शेपटी**–tail.<br>**इवली**–tiny.<br>**हालवणे**–to move. | **चाहूल**–sound of someone coming near.<br>**थोडीशी**–little.<br>**दडी मारणे**–to hide.<br>**भित्रा**–cowardly. |

## स्वाध्याय

**(१) ऐका आणि म्हणा. सारख्या अक्षरांखाली रेघ ओढा :**

(१) ससा रे ससा असा कसा.

(२) डोळे लाल लाल. गुबगुबीत गाल.

(३) कुरुकुरु, तुरुतुरु.

**(२) शब्द शोधा. ◯ करा :**

| | | | |
|---|---|---|---|
| स | सा | का | न |
| डो | ळे | अं | ग |
| शे | प | टी | भि |
| ग | व | त | त्रा |

**(३) पाहा. गिरवा. लिहा. वाचा :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चा | चा | चा | चा | चा | चा |
| छा | छा | छा | छा | छा | छा |
| जा | जा | जा | जा | जा | जा |
| झा | झा | झा | झा | झा | झा |

## उपक्रम

(१) सशाची चित्रे जमवा. तुमच्या वहीत चिकटवा.

(२) सशाशी संबंधित कथा/गाणी मिळवा. वर्गात दाखवा.